**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक १७/०७/२०२४ (बुधवार) दुपार**

---

## नागपूर ग्रामीण हद्दीमधील सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

दिनांक १६/०७/२०२४ रोजी पोस्टे कुही येथील स्टाफ पोस्टे कुही परीसरात पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, मांढळ बस स्टॉपच्या मागे झाडाखाली एक इसम सार्वजनिक ठिकाणी लोकांकडुन पैसे घेवुन त्यांना कागदी चिट्ठयावर सट्टापट्टी, वरळी मटका जुगाराचे आकडे लिहुन जुगाराचा खेळ खेळवत आहे. अशा माहिती वरून कुही येथील मांढळ बस स्टॉपच्या मागे झाडाखाली सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे– लक्ष्मण बिशन दुधपचारे वय ४९ वर्ष रा. वार्ड क्र. ३, मांढळ ता. कुही** हा सट्टापट्टी, वरली मटका जुगाराचे आकडे लिहताना मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याची झडती घेतली असता एक बॉल पेन किमंती ०५/०० रूपये व नगदी ७४५/–रूपये असा एकुण ७५०/–रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूध्द पोलीस ठाणे कुही कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच पोस्टे सावनेर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना गोपनीय माहिती मिळाली की, मौजा पाटणसावंगी येथे **आरोपी नामे– सुनील माणिकराव मडावी वय ४५ वर्ष राह. वार्ड नं १ पाटणसावंगी ता. सावनेर जि नागपूर** हा सार्वजनिक ठिकाणी लोकांकडून सट्टापट्टीचे वेगवेगळे जुगाराचे आकडे व पैसे घेऊन ते जुगाराचे आकडे कागदावर लिहून देऊन वरली मटक्याचा हारजीतचा जुगार खेळवताना मिळून आल्याने त्याचेकडून १) नगदी ४८०/– रू. २) एक निळया शाईचा बॉलपेन की. ०५/– रू. ३) एक सट्टापट्टीचे वेगवेगळे आकडे लिहिलेला कागद ४) एक निळया रंगाचा कार्बन की. ०५/– रू. एकुन ४९०/– रु चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम १२ अ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर